प्रबोधन
गोरेगाव

# २६ वा वार्षिक अहवाल
## १९९८-९९

# प्रबोधन, गोरेगाव

## प्रबोधन क्रीडाभवन

प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.)मुंबई ४०० १०४

### २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रबोधन गोरेगाव या संस्थेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २९ जानेवारी २००० रोजी प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.) मुंबई ४००१०४ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती

सभेची वेळ रात्री ९.०० वाजता वेळ :- रात्री ठीक ९.०० वाजता

**सभेपुढील कामकाज :**

१ प्रास्ताविक

२ सन १९९७-९८ सालच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचन व त्यास मंजूरी देणे

३ १९९८-९९ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद (हिशेब तपासनीसांचा अहवाल वाचून मंजूर करणे)

४ संस्थेच्या कार्यात व्यापकता आणण्यासाठी घटनेत करावयाच्या दुरुस्ती संबंधी चर्चा. (सोबत सभासदांच्या माहितीसाठी प्रस्तावित दुरुस्तीचा तपशील जोडला आहे.)

५ नवीन वर्षा करिता १९९९-२००० घटनेच्या कलम ७ इ. प्रमाणे अध्यक्ष (१ जागा) उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे (एकूण ६ जागा)

६ नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशेब तपासनीस यांची नेमणूक करणे.

७ अध्यक्षांच्या अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरून

श्री. पांडुरंग पोखरकर

कार्याध्यक्ष

दि. २/१२/१९९९

गोरेगाव मुंबई ४०० १०४

**डॉ. मनोहर अद्‌वानकर**

प्रमुख कार्यवाह

१ संस्थेचा जमाखर्च, प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.)मुंबई ४००१०४ येथील संस्थेच्या कार्यालयात दि. २४/१/२००० ते २५/१/२००० पर्यंत रोज संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत अवलोकनार्थ ठेवण्यात येईल. कोणाही सभासदास त्याबाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या दिनांक २७/१/२०००पूर्वी कार्याध्यक्षांकडे लेखी सादर कराव्यात.

२ गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

३ निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. २७/१/२००० पूर्वी संस्था कार्यालयात संध्याकाळी ६ ते ७ या वेळात आणून द्यावेत. अर्जाचा नमुना सोबत दिला आहे.

# प्रबोधन, गोरेगाव

## २६ वा वार्षिक अहवाल १९९८-१९९९

प्रबोधन गोरेगाव या संस्थेचा २६ वा वार्षिक अहवाल संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना सादर करताना आम्हास अत्यानंद होत आहे. संस्थेच्या कार्याचा व खेळाडूंच्या कामगिरीचा अहवाल आशादायक व आनंददायक आहे आणि आमच्या सर्व सन्माननीय सभासदांना तो निश्चित अभिमानास्पद वाटेल. या अहवाल वर्षात कार्यकारिणीच्या एकूण १३ सभा झाल्या. त्या सभांना सरासरी १७ उपस्थिती होती. संस्थेच्या कार्यकारिणीच्या सभासदांची संख्या स्वीकृत सभासदांसह २० होती.

### मार्मिक मैफिल

प्रबोधन प्रकाशन व प्रबोधन गोरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने गोरेगाव येथे प्रबोधन क्रीडाभवनाच्या मैदानावर साप्ताहिक 'मार्मिक मैफिल' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मुंबई महानगरपालिकेचे महापौर मा. श्री. नंदू साटम, नगरविकास राज्यमंत्री श्री. रवींद्र माने, स्थानिक स्वराज्य संघाच्या संचालिका स्नेहा पळणीटकर, माजी नगरसेवक रमेश जोशी, निवृत्त अतिरिक्त आयुक्त श्री. एम. अंभईकर उपस्थित होते. या मैफिलीतला पहिला कार्यक्रम व्यंगचित्र प्रात्याक्षिक व महापौर परिषद या विषयावरिल परिसंवादाने झाला. दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राचे कामगार मंत्री श्री. शाबीर शेख यांचे प्रवचन झाले. गीतकार श्री. जगदीश खेबूडकरांच्या गीतांच्या आठवणीवरआधारीत मुलाखतीचा व गीतांचा उत्कृष्ट कार्यक्रम तिसऱ्या दिवशी झाला. हास्य कविसंम्मेलन हा गोरेगावकरांना नाविन्य असलेला कार्यक्रम चवथ्या दिवशी झाला. या कार्यक्रमात कविवर्य श्री.अशोक नायगावकर, श्री. रामदास फुटाणे, श्री. नलेश पाटील, श्री. अशोक बागवे व श्री. अरुण म्हात्रे यांचा सहभाग होता. मैफिलीचा समारोप "जोडी तुझी माझी जमली" या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाने झाला. यामध्ये श्री. प्रभाकर पणशीकर व सौ. पणशीकर, श्री. सुभाष दांडेकर व सौ. रजनी दांडेकर, श्री. जयदेव हट्टंगडी व सौ. रोहिणी हट्टंगडी, श्री. प्रदिप दळवी व सौ. प्रतिक्षा दळवी-लोणकर, श्री. प्रशांत दामले व सौ. गौरी दामले आदी जोडप्यांचा सहभाग होता. विविध क्षेत्रातील प्रतिष्ठीत जोडप्यांची हलकीफुलकी मुलाखत श्री.अजितेम जोशी व सौ. मंगला खाडीलकर यांनी घेतली. आठवडाभर चाललेल्या या कार्यक्रमाचा आनंद रसिक श्रोत्यांनी मनसोक्त घेतला व संपूर्ण कार्यक्रमाची प्रशंसा केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. अजितेम जोशी व श्री. सुदेश म्हात्रे यांनी विशेष परिश्रम घेतले.

### प्रबोधन-दैनिक सामना आंतरशालेय व आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा (अखिल महाराष्ट्र पातळीवरील)

'प्रबोधन गोरेगाव' ही संस्था गेली २६ वर्षे राज्यस्तरीय पातळीवरील आंतरशालेय व आंतर-महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा अयोजित करीत असून, १९९७ सालापासून ही स्पर्धा दै. सामनाच्या सहकार्याने आयोजित केली जात आहे.

स्पर्धेला या वर्षी राज्यातील ३० शालेय व २५ महाविद्यालयीन संघांनी भाग घेतला होता. मुंबई बाहेरील स्पर्धकांची निवास व भोजन व्यवस्था विनामूल्य करण्यात आली व त्यांच्या जाण्यायेण्याच्या सवलतीच्या प्रवास खर्चाची व्यवस्था संस्थेने केली होती. संस्थेने गतवर्षीपासून रोख पारितोषिकांच्या रक्कमेतही भरघोस वाढ केली आहे. यंदा ही स्पर्धा प्रबोधन गोरेगाव, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ

एस्. एस्. नायक
सनदी लेखापाल
बोटावाला बिल्डिंग, १ ला मजला
७/१०, हार्निमन सर्कल,
मुंबई - ४०० ०२३

# प्रबोधन गोरेगाव

**धर्मादाय विश्वस्त संस्था नों. क्र. एफ् -२५०२ (मुंबई)**

## सनदी लेखापालांचा अहवाल

प्रबोधन गोरेगाव संस्थेचे ३१ मार्च १९९९ ला पूर्ण होणाऱ्या वर्षाचे हिशेब आम्ही तपासले असून त्यासंबंधात पुढील माहिती देत आहोत.

खालील बाबींच्या सदर्भात हिशेबात तरतूदी करण्यात आल्या नाहीत.

(१) १) क्रीडाभवनाच्या बांधकामापोटी बृहन्मुंबई महानगरपालिकेस देय असलेल्या उर्वरित २५% रक्कमेची तरतूद हिशेबात करण्यात आलेली नाही, कारण सदर रक्कम महानगरपालिकेने निश्चित केलेली नाही, किंवा कळविलेली नाही.

२) सन १९९२ पासून क्रीडाभवनासंबंधातील महनगरपालिकेचे देय कर रु. ५,३४,०१०/- यांची तरतूद हिशेबात करण्यात आलेली नाही कारण करसंबंधातील रक्कम संस्थेने विवाद्य मानली आहे.

(२) वरील मुद्दे गृहित धरुन असे म्हणता येईल की,

**संस्थेने**

१) हिशेब नियमितपणे व संबंधित कायदा व नियम यानुसार ठेवलेले आहेत.

२) आय आणि व्यय योग्य व बिनचुक पद्धतीने हिशेबात दाखविले आहेत.

३) व्यवस्थापकाच्या ताब्यातील गंगाजळी व खर्चाच्या पावत्या हिशेब तपासणीच्या दिवशी हिशेब पत्रकाशी सुसंगत होत्या.

४) सर्व पुस्तके, करार, हिशेब, खर्चाच्या पावत्या व अन्य कागदपत्रे आम्हास दाखविण्यात आली.

५) जंगम मालमत्तेची नोंद योग्यरित्या ठेवलेली होती, त्यातील बदल वेळोवेळी कळविले होते.

६) आमच्या आवश्यकतेनुसार कार्यकारिणी सदस्य उपस्थित राहिले व आवश्यक माहिती त्यांनी दिली.

७) संस्थेचा कोणताही निधी किंवा मालमत्ता संस्थेच्या उद्दिष्ट किंवा ध्येयांव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी वापरण्यात आलेला नाही.

ज्ञान-क्रीडा-सेवा यांची त्रिवेणी

# प्रबोधन
गोरेगाव

२७ वर्षाच्या देदीप्यमान कालखंडामध्ये
बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यातून

**प्रबोधन क्रीडाभवन**

या सर्वांगसुंदर क्रीडासंकुलाची निर्मिती, ज्यामध्ये
क्रिकेट, जिम्नॅस्टिक्स, ॲथलेटिक्स, टेबलटेनिस, योग, ॲरोबिक्स व
नृत्य यांचे तज्ज्ञांकडून अष्टपैलू प्रशिक्षण उपलब्ध
तसेच सुसज्ज व्यायामशाळा, हेल्थ क्लबमध्ये स्टीमबाथ, सौनाबाथ, जाकूझी, इत्यादि
सुविधांची सोय आणि आता
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सहकार्यातून साकार झालेले

**प्रबोधन जॉगर्स पार्क**
**व**
**टेनिस ॲकॅडेमी**
**मध्ये**

टेनिस प्रशिक्षणाची व सरावाची सुविधा आणि सुंदर जॉगिंग ट्रॅक.

---

मराठी, इंग्रजी व हिंदी साहित्याने परिपूर्ण

**प्रबोधनकार ठाकरे वाचनालय**

आपणा सर्वांसाठी उत्तमोत्तम पुस्तके आणि बाळगोपाळांसाठी मनोरंजनाचा मेवा

**संपर्क : प्रबोधन क्रीडाभवन**, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर,
गोरेगाव (प.), मुंबई-४०० १०४ दूरध्वनी : ८७३ ४८ ६९

**प्रबोधन जॉगर्स पार्क**, सिद्धार्थ नगर, रस्ता क्र. १७ द्वारा महात्मा गांधी मार्ग,
गोरेगाव (प.), मुंबई- ४०० दूरध्वनी : ८७८ २३ २४

# प्रबोधन गोरेगाव

प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.) मुंबई ४०० १०४
दूरध्वनी : ८७३ ४८ ६९

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदवलेली संस्था (*Regn.No. Mum. 46/72 GB BSD*) मुंबई
सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदलेली संस्था (*Regn. No. F 2502 Mum*)

१९९८-९९

| | | |
|---|---|---|
| संस्थापक व प्रमुख सल्लागार | : | श्री सुभाष देसाई |
| अध्यक्ष | : | श्री. वसंत तावडे बी ए |
| उपाध्यक्ष | : | श्री. गिरीश देसाई डी सी ई |
| | | श्री. श्रीनिवास शिरसेकर जी डी आर्ट |

**कार्यकारी मंडळ**

| | | |
|---|---|---|
| कार्याध्यक्ष | : | श्री. पांडुरंग पोखरकर बी एससी |
| प्रमुख कार्यवाह | : | डॉ. मनोहर अद्वानकर एम एससी, पीएच डी |
| सहकार्यवाह | : | श्री नितिन शिंदे बी ए डी जे |
| | | श्री. समीर त्रैलोक्य बी एससी |
| खजिनदार | : | श्री. महादेव खानोलकर डी पा आर्ट |

**सभासद**

श्री. विलास देवरुखकर बी एससी (ऑ)
श्री. दिनकर मालवणकर
श्री. चंद्रकांत पोतदार
श्री. मिलींद डुंबरे बी कॉम
श्री. भूषण काळे
श्री. राधाकृष्ण भट
श्री. विनोद निंबाळकर
श्री. पद्माकर देसाई बी एससी (ऑ)
ॲड. विकास रेळे बी ए, एल एल बी
श्री. चंद्रकांत देऊलकर
श्री. सुरेश चव्हाण बी ए
श्री. सुधीर मिठबावकर बी एससी बी एड
श्री. सुनील कविश्वर
श्री. जेकब जॉन्सन

**अंतर्गत हिशोब तपासनीस**

श्री. रवींद्र नाखरे बी कॉम डी एफ एम

**सनदी लेखापाल**

मे. एस. एस. नायक आणि कं.